राज्यातील शाळांमध्ये ५ वी ते ८ वी
चे वर्ग सुरक्षितपणे सुरु करणे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.२०४/एसडी-६
मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८ जानेवारी, २०२१

<u>वाचा</u> :- १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १५ जुन, २०२०.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २४ जुन, २०२०.
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २२ जूलै, २०२०.
४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १७ ऑगस्ट, २०२०.
५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २९ ऑक्टोबर, २०२०.
६) केंद्र शासनाच्या दि.०८.०९.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
७) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६; दिनांक १० नोव्हेंबर,२०२०.

**<u>पार्श्वभूमी :-</u>**

कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये वरील संदर्भ क्र. ७ येथील परिपत्रकान्वये इयत्ता ९ वी ते १२ वी चे वर्ग दि. २३ नोव्हेंबर, २०२० पासून सुरु करण्यात आले आहेत. राज्यातील शाळांमध्ये इयत्ता ९ वी ते १२ वी चे वर्ग सुरक्षितपणे सुरु असून टप्प्या- टप्प्याने इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विध्यार्थ्यांची उपस्थिती वाढली आहे. राज्यातील कोविड बाधित रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्य:स्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आलेली आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे शाळांमध्ये कोविड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये व त्याचा मानसिक परिणाम विद्यार्थी व पालकांवर होऊ नये या धारणेतून शाळा सुरू करणे विद्यार्थ्यांसाठी हितावह राहील. राज्यातील शाळा सुरू करण्यास सार्वजनिक आरोग्य विभाग सहमत आहे. यानुसार राज्यातील इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी साठी शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**परिपत्रक:-**

१. राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी चे वर्ग दिनांक २७ जानेवारी, २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. कोविड-१९ बाबत केंद्र व राज्य शासनाच्या सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच या विभागाच्या संदर्भाधीन दि.१५ जुन, २०२० , दि. २९ ऑक्टोबर,२०२० व दि. १० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. संबंधित जिल्हा परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका इत्यादींनी शाळा व वर्ग सुरक्षितपणे सुरु होतील याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन परिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०११८१२३७०६९१२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA SHANKARRAO PAWAR

Digitally signed by RAJENDRA SHANKARRAO PAWAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SCHOOL EDUCATION & SPORT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, serialNumber=01d5ac9d227fcf738d4d5a366976c83175db4f058411807fb1031c17dd155677, cn=RAJENDRA SHANKARRAO PAWAR
Date: 2021.01.18 12:43:29 +05'30'

**( राजेंद्र पवार )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
५) मा. सभापती व मा. उपसभापती, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
६) मा. मंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रभारी संचालक, बालभारती,
१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६) शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक (सर्व)
१७) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१८) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१९) निवडनस्ती(कार्या.एसडी-६)